
Tembo Agro™



## GET IN TOUCH NOW


Phone: +91-79772 27204, 77770 60026
Email: info@temboagro.com
pratiksalvi5022@gmail.com
Web: www.temboagro.com

**Tembhey:** Plot No. 115, Shivaji Wadi,
Near Tembhey High School,
Tembhey, Ratnagiri 415612.

**Mumbai:** Shop No. 6,
Gorai Shiv Shambho CHS., RSC 283,
Gorai 3, Borivali (W), Mumbai 400092.






संवर्धन हिरव्या
भविष्याचे...

Tembo Agro™




# ऋणानुबंध आपल्या मातीशी

अवध्या विश्वाला भूरळ घालणार्या महाराष्ट्र संस्कृती बरोबरच महाराष्ट्राचे नंदनवन असणा-या कोकणाला स्वतःची अशी एक लोभसवाणी संस्कृती आहे.



**ऋणानुबंधाची फुले कधीच कोमेजत नसतात,
आठवणींच्या सुगंधाने ती सदा दरवळत असतात,
आपण स्वतः लावलेल्या झाडाची आठवण...
हा तोच सुगंध असतो आणि जन्मोजन्मीच्या
ऋणानुबंधाचा तो दरवळ असतो.**

## कोकण प्रांत

निसर्गाने दहा हातांनी भरभरून दिलेले सृष्टी सौंदर्य, डोंगर दर्यात वसलेला, हिरवळीने नटलेला, तांबड्या मातीचा टिळा लावलेला हा प्रांत, म्हणजेच प्रत्यक्ष श्री परशुरामाची पवित्र भूमी. याच प्रांतात प्रकर्षाने चमकणारा रत्नागिरी जिल्हा. कोकणी माणूस अंगाने काटक, स्वभावाने प्रेमळ, परिस्थिती कशीही असो परंतु सदैव अतिशय सहनशील, आलेल्या संकटाशी समर्थपणे सामना करणारा, निसर्गावर मनापासून प्रेम करणारा असा हा कोकणी माणूस, नैसर्गिक संपत्ती ही चलनी संपत्तीपेक्षा श्रेष्ठ असून तिचे रक्षण करणे महत्वाचे आहे, असे मनापासून मानणारा आहे.

आज मुंबई-पुण्या सारख्या आधुनिक शहरांतील जीवनमान गतीशील झाले आहे. संवाद आणि मनःशांती हरवू पहात आहे. माणूस, मग तो कोणत्याही जातीचा असो, त्याला कांही काळ शांतता हवी असते... त्याला हिरव्यागार झाडाच्या सावलीत ताजंतवानं व्हायच असतं आणी पुढच्या क्षणासाठी नव्या झाडासारखं हिरवगार रूजून यायचं असतं... पण, पाहता पाहता मोठे झालो, सगळेच गणित बदलत गेले, छोटया छोटया आनंदाचे, क्षण केव्हांच उडून गेले. मुलांचेही तेच आहे. शाळेतून आल्यावर क्लास आहे. त्यांचे खेळणे-हसणे बागडणे बंद झाले. त्यांच्या मामाच गावच हरवलय.

चिंता करू नका तुमच्या सारख्या अनेकांची हि चिंता लक्षात घेऊन आम्ही साळवीज, टेंबो ॲग्रो टुरीझमने यावर यशस्वी मार्ग काढलाय.

रत्नागीरी शहरापासून थोडयाच अंतरावर असणारे टेंबे हे गाव. इथेच साळवीज, टेंबो ॲग्रो टुरीझमने पहिल्या फेज मध्ये ३ एकर जागेवर प्रोजेक्ट सुरू केला आहे. १५ वर्षापूर्वी लावलेली सागाची शंभर एक झाडे आहेत. पर्यटकांसाठी राहण्यासाठी कॉटेजेस आहेत. जेवणाची उत्तम व्यवस्था आहे. रत्नागिरीमध्ये आवर्जून पाहावीत अशी अनेक स्थळे आहेत. त्याचा तपशील आम्ही आपल्याला देऊच.

आपल्यासारख्या अभिरूची संपन्न निसर्गप्रेमींना एक सुवर्णसंधी आहे. आपल्या प्रत्येकांच स्वतःच्या हातांनी लावलेलं आणि मालकीहक्क असलेलं साग, चंदन आणी रक्तचंदन ही झाडे तिथे असणार आहेत.

हिच झाडे कां ? तर झाड लावल्यानंतर त्याचे रजिस्ट्रेशन होईल आणि अत्यंत महत्वाचे म्हणजे कायदेशीर रित्या याची पूर्ण वाढ झाल्या शिवाय चे कोणालाही तोडता येत नाही. या झाडांची निगा जोपासना ही पूर्णपणे आमची जबाबदारी. आपण स्वतःलावेलेल्या झाडांची वाढ कुठवर झाली आहे याची माहिती आपल्याला दर सहा महिन्यानी दिली जाईल. आपल्या झाडाच्या ओढीने कधीही यावेसे वाटल्यास आपण निःसंकोचपणे कधीही येऊ शकता.

**प्रत्येक छोटे योगदान, काहीतरी मोठे निर्माण करते. म्हणूनच निसर्गाच्या संवर्धनासाठी आपल्या मदतीच्या हातांची गरज आहे.**

चंदन आणि सागासारख्या असंख्य वृक्षांची पद्धतशीर लागवड करून, जास्तीत जास्त व्यावसायिक संधी निर्माण करणे तसेच भूमाता व मानव यांच्यामध्ये अतूट असे अनोखे नाते निर्माण करणे.

## चंदन (पांढरे व लाल)

चंदन हे भारतीय संस्कृतीशी संबंधित एक मौल्यवान झाड आहे. हे जगातील महागड्या लाकडांमध्ये दुसऱ्या क्रमांकावर येते. झाडाच्या गाभ्याच्या लाकडात सुगंध असल्याने ते मौल्यवान ठरते आणि कोरीव काम करण्यासाठी उत्कृष्ट नैसर्गिक साहित्यांपैकी एक असते. गंध (परफ्यूम), सौंदर्यप्रसाधने, अरोमाथेरॅपी आणि औषधनिर्माण करताना (फार्मास्युटिकल्समध्ये) चंदन तेलाचा उपयोग केला जातो.

पारंपारिक औषधांमध्ये जंतुनाशक (अँटीसेप्टिक) ॲस्ट्रिंजेंट म्हणून डोकेदुखी, पोटदुखी आणि मूत्र व जननेंद्रियाच्या विकारांवर उपचार करण्यासाठी चंदनाचे तेल वापरले जाते. भारतात चंदनाचे गंधयुक्त तेल (एसेन्शिअल ऑइल), इमल्शन किंवा पेस्टचा वापर दाह आणि उद्रेककारी त्वचारोगांच्या उपचारात केला जातो. तेलाचा वापर पारंपारिक आयुर्वेदिक औषधी प्रणालीमध्ये मूत्रवर्धक आणि सौम्य उत्तेजक द्रव्य म्हणून आणि त्वचा नितळ करण्यासाठी केला गेला आहे.







### फायदे


- चंदन एक दाह-विरोधी एजंट म्हणून कार्य करते
- चंदन हे प्रामुख्याने गंध-द्रव्याच्या (परफ्यूमरी) उत्पादनांमध्ये वापरले जाते
- ताण, उच्च रक्तदाब कमी करण्यासाठी अरोमाथेरॅपीमध्ये चंदनाचे गंधयुक्त तेल (एसेन्शिअल ऑइल) वापरण्यात येते
- चंदनाच्या गंधयुक्त तेलामुळे (एसेन्शिअल ऑइलमुळे) जखमा भरून निघतात आणि त्वचेच्या डागांवर उपचार करता येतो
- चंदनाचा उपयोग धार्मिक विधींमध्ये केला जातो
- चंदनाच्या गंधयुक्त तेलात (एसेन्शिअल ऑइलमध्ये) अँटीसेप्टिक, अँटी-इंफ्लेमेटरी, अँटीस्पास्मोडिक आणि ॲस्ट्रिंजेंट असे गुणधर्म आहेत
- चंदनाचे गंधयुक्त तेल स्मरणशक्ती वाढवणारे (मेमरी बूस्टर) असते

THE TIMES OF INDIA

*आता कोणीही चंदनाचे झाड वाढवू आणि कापू शकतो*

Read more at: http://timesofindia.indiatimes.com/articleshow/81920275.cms?utm_source=contentofinterest&utm_medium=text&utm_campaign=cppst

**आमचा विश्वास आहे की खात्रीशीर सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी असंख्य झाडे लावून लोकांना एकत्र आणून प्रगती करता येते.**




# पर्यावरणीय फायदे

चंदनाचे उत्पादन आर्थिक व पर्यावरणीय फायदे जास्तीत जास्त वाढविण्यासाठी डिझाइन केलेले असते. चंदनाची लागवड मानवासाठी पर्यावरणस्नेही असते, ज्यामुळे माती आणि पाणी यासारख्या नैसर्गिक संसाधनांमध्ये बराच हातभार लागतो.

## माती आणि जलसंधारण

जमिनीची झीज कमी करून, माती स्थिर करून, मुक्त पोषक द्रव्ये साफ करून, वाहून जाणे कमी करून, पाणी आत झिरपणे सुधारून आणि एकूणच सेंद्रिय पदार्थ वाढवून माती आणि जलसंसाधनांचे संवर्धन करण्यास वृक्ष रोपण मदत करते. यामुळे फायदेशीर सजीवांना प्रोत्साहन मिळते जे एकूण मातीची उत्पादकता सुधारतात.



# शेतकरी बना आणि भूमातेशी नाते जोडा.



आपली माती सुपीक, सेंद्रिय आणि झीजमुक्त करण्यात अतिशय आनंद मिळतो आणि अभिमान सुद्धा वाटतो कारण यामुळे आपल्या भूमातेला निरोगी ठेवता येते.

## आमची उद्दीष्टे



पुढील 3 वर्षांत **50 एकर** पेक्षा जास्त लागवड केलेली जमीन.

**5000** हून अधिक **नारळाची झाडे** लावणे

पुढील 5 वर्षांत कोकण पट्ट्यात **कृषी पर्यटन रिसॉर्ट्सना** प्रोत्साहन देणे

पुढील 3 वर्षांत **50 एकरपेक्षा** जास्त जमिनीवर **आल्याची** लागवड करणे

**10,000** पेक्षा जास्त **शेतकऱ्यांसाठी** काम निर्माण करणे

महाराष्ट्रातील पहिल्या शेतकरी सहकारी **आंबा कॅनिंग** उद्योगाची सुरुवात करणे

**10,000** पेक्षा जास्त **महिलांसाठी** रोजगार निर्मिती करणे

# टेंबो ॲग्रो गुंतवणुकीचे फायदे

आमच्या प्रकल्पात गुंतवणूक का करावी,
आपल्याला मिळणाऱ्या अतिरिक्त महसुलाचा
उपयोग यासाठी करता येईल;



आपल्या मुलांच्या
उच्च शिक्षणासाठी.



आपले व्यवसाय
उपक्रम वाढविण्यासाठी.




आपल्या आवडीची मालमत्ता (प्रॉपर्टी) खरेदी करण्यासाठी.



आपल्या लाडक्या मुलाचं किंवा मुलीचं लग्न करण्यासाठी.

# प्रगतिशील तक्ता (प्रोग्रेसिव्ह चार्ट) - चंदन




# तुलना

| | Investing in Mutual Fund | Investing in Tembo Agro Farming |
|---|---|---|
| Frequency of Investment | Regular | Onetime |
| Impact of Market | High | Low |
| Taxes Application | Taxable | Nontaxable |
| Refund | 40-50% | 300%* |

(* as per market price)



## Location Map




**अंतर**

टेंबो ऍग्रो ते टेंबो ऍग्रो रिसॉर्ट - 3 किमी.

टेंबो ॲग्रो रिसॉर्ट ते रत्नागिरी स्टेशन - 5 किमी.